# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

(सेंट्रल प्रोव्हींसेस शासन शिक्षण विभागाची अधिसूचना क्रमांक ५१३ दिनांक १ ऑगस्ट १९२३ द्वारा स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ

**(विद्या शाखा)**

छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय परिसर, रवीन्द्रनाथ टागोर मार्ग, नागपूर – ४४० ००१.

दूरध्वनी: कार्यालय: ०७१२–२५३२०६३, २५६०६२४, **Email- dracad@nagpuruniversity.nic.in**


## अधिसूचना

क्रमांक: रातुमनावि/विद्या/२०१८/९/१९ दिनांक: ३० जून २०१८

या अधिसूचनेद्वारे सर्व संबंधीतांना सूचित करण्यात येते की, दिनांक ९ जून २०१८ रोजी प्रकाशित अधिसूचना क्रमांक रातुमनावि/विद्या/२०१८/१/०४ अन्वये विद्यापीठाच्या विविध अभ्यासमंडळाचे अभ्यासमंडळनिहाय अध्यक्षासाठी निवडणूक वेळापत्रक जाहिर करण्यात आले होते. त्यानुसार मॅथेमॅटिक्स अभ्यासमंडळाच्या अध्यक्षपदासाठी प्राप्त नामनिर्देशन पत्राची छाननी दिनांक २० जून २०१८ रोजी करण्यात आली. डॉ. गणेश दिनकरराव केदार यांचे नामनिर्देशन पत्र कुलसचिव व निवडणूक निर्णय अधिकारी यांनी अवैध ठरविले होते. कुलसचिव व निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या निर्णयाविरूध्द डॉ. केदार यांनी दिनांक २२ जून २०१८ रोजी मा. कुलगुरू व अपिलीय अधिकारी यांना अपिल सादर केली होती. सदर अपिलवर दिनांक २४ जून २०१८ रोजी सुनावणी घेण्यात आली. यादरम्यान डॉ. गोवर्धन खडेकर यांनी डॉ. केदार यांच्या पात्रतेसंदर्भात मा. कुलगुरू यांच्याकडे दिनांक २२ जून २०१८ रोजी तक्रार सादर केली होती. सदर तक्रारीच्या अनुषंगाने मा. कुलगुरू व अपिलीय अधिकारी यांनी डॉ. केदार यांना अध्यक्षपदासाठी अपात्र ठरविले होते. त्यानुसार दिनांक २६ जून २०१८ रोजीच्या अधिसूचनेनुसार मॅथेमॅटिक्स अभ्यासमंडळाच्या अध्यक्षपदासाठी पात्र उमेदवारांची अंतिम यादी प्रकाशित करण्यात आली होती. तद्नंतर मा. कुलगुरू व अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाविरूध्द डॉ. केदार यांनी मा. उच्च न्यायालयात, नागपूर खंडपीठ येथे रिट याचिका क्रमांक ३६५५/२०१८ दाखल केली होती. सदर याचिकेवर मा. उच्च न्यायालयानी दिनांक २८ जून २०१८ रोजी दिलेल्या निर्णयानुसार डॉ. खडेकर यांनी सादर केलेल्या तक्रारीवर मा. कुलगुरू व अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २९ जून २०१८ रोजी दुपारी १२.०० वाजता पुन:श्च सुनावणी घेतली. सुनावणीअंती मा. कुलगुरू व अपिलीय अधिकारी यांनी घेतलेला निर्णय संबंधीतांना कळविण्यात आला असून मा. उच्च न्यायालयानी दिलेल्या निर्णयानुसार मॅथेमॅटिक्स अभ्यासमंडळाच्या अध्यक्षपदाच्या निवडणूकीच्या वेळापत्रकात (वैध नामनिर्देशित उमेदवारांची अंतिम यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक व वेळ पासूनच्या पुढील प्रक्रियेत) खालील प्रमाणे बदल करण्यात येत आहे. त्यानुसार खालील प्रमाणे झालेल्या बदलाची सर्व संबंधीतानी कृपया नोंद घ्यावी.

### सुधारित निवडणूक वेळापत्रक
### (मॅथेमॅटिक्स अभ्यासमंडळ)

| | | |
|---|---|---|
| १. | वैध नामनिर्देशित **उमेदवारांची अंतिम यादी** प्रसिध्द करण्याचा **दिनांक व वेळ.** | **रविवार,<br>दिनांक १ जुलै २०१८<br>सायंकाळी ५.०० वाजता** |
| २. | वैध नामनिर्देशित उमेदवारांच्या यादीमध्ये समाविष्ट असलेल्या उमेदवाराला **निवडणूकीतून माघार** (Withdrawal) घ्यावयाची असल्यास, त्यासाठी लेखी सूचना सादर करण्याचा **दिनांक व वेळ** | **सोमवार,<br>दिनांक २ जुलै २०१८<br>सायंकाळी ५.०० पर्यंत** |
| ३. | निवडणूकीसाठी निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्याचा **दिनांक व वेळ.** | **मंगळवार,<br>दिनांक ३ जुलै २०१८<br>सायंकाळी ५.०० वाजता** |
| ४. | निवडणूकीसाठी **सभेच्या सभागृहातील निवडणूकीचा दिनांक व वेळ.** (आवश्यक असल्यास). | **शनिवार,<br>दिनांक ७ जुलै २०१८<br>सकाळी ११.३० ते दुपारी<br>१२.०० वाजेपर्यंत** |

| | | |
|---|---|---|
| ५. | **निवडणूकीची मतमोजणी सभेच्या सभागृहात** करण्याचा व निवडणूकीचे निकाल घोषित करण्याचा **दिनांक व वेळ.** | शनिवार,<br>दिनांक ७ जुलै २०१८<br>मतदानानंतर लगेच |

**मा. कुलगुरूंच्या आदेशान्वये**

**(डॉ. पुरणचंद्र मेश्राम)**
**कुलसचिव व निवडणूक निर्णय अधिकारी**

**प्रतिलिपी माहिती व आवश्यक कार्यवाहीकरिता:**

१. उपरोक्त अभ्यास मंडळाचे सर्व सन्माननीय सदस्य,
२. विद्यापीठ शैक्षणिक विभागांचे सर्व विभाग प्रमुख.
३. विद्यापीठ संचालित व संलग्नित महाविद्यालयांचे सर्व प्राचार्य व संचालक.
४. विद्यापीठाचे सर्व अधिकारी व शाखा प्रमुख, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर.
५. डॉ. विणा प्रकाशे, माहिती शास्त्रज्ञ (प्राध्यापक श्रेणी), राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर.

यांना विनंती करण्यात येते की, वरील अधिसूचना विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रकाशित करण्याबाबत आवश्यक कार्यवाही घ्यावी.

**(डॉ. अनिल हिरेखण)**
**उपकुलसचिव (विद्या) व**
**सहायक निवडणूक निर्णय अधिकारी**

**NOTIFICATION-2**